माहितीचा अधिकार

दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/११२/२०१८
दि.१५/०९/२०१८.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.

श्री.कृष्णा सी. गुप्ता, ...............अपिलार्थी
एस-१०६, पाटाडिया कॉम्प्लेक्स,
जनार्दन रकवी मार्ग, उत्तन रोड,
भाईंदर (प.), जि.ठाणे. ४०११०१

जनमाहिती अधिकारी तथा, ...............प्रतिवाद
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

## -: विवेचन :-

श्री.कृष्णा सी. गुप्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांचेकडे दि.१०/०४/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) जे.एन.पिंपळे, चौकशी अधिकारी यांनी मिभामनपातील आजमितीपर्यंत घेतलेल्या सुनावणीची संपुर्ण माहिती घ्यावी.
२) एका सुनावणीसाठी त्यांना दिले गेलेल्या मानधनाची माहिती द्यावी.
३) त्यांनी आजमितीपर्यंत घेतलेल्या सुनावणीचे सर्व आदेशाची सत्यप्रत देण्यात यावी.
४) आजमितीपर्यंत जे.एन.पिंपळे यांच्या सुनावणी नंतर निर्दोष व दोषी करार दिलेल्या अधिकाऱ्यांची यादी देण्यात यावी.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत दि.१०/०४/२०१८ रोजी माहिती अधिकार अंतर्गत अपुर्ण माहिती देऊन मानसिक त्रास दिला असुन माहिती अधिकार कायद्याचा पुर्णपणे Violation केल्याने अपिलार्थी अर्जदार यांनी दि.२०/०८/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी अर्जदार व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.३१/०८/२०१८ रोजी दुपारी १२.३५ वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/३४२/२०१८ दि.२१/०८/२०१८ अन्वये कळविण्यात आले होते.

परंतु सदर दिवशी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) हे मतदार याद्यांचा संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम बैठकीच्या सविस्तर चर्चेसाठी जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे बैठकीस गेले असल्याकारणाने सुनावणी रद्द करण्यात आली असुन सदर सुनावणी

दि.०७/०९/२०१८ रोजी दुपारी ०१.२० वाजता आयोजित करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने अपिलार्थी अर्जदार व जनमाहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त (आस्थापना) यांना जा.क्र.मिभामनपा/ उपआ.आस्था/३५९/२०१८ दि.३०/०८/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते.

परंतु सदर दिवशी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) हे मा.स्थायी समिती सभेस उपस्थित असल्याने सुनावणी रद्द करण्यात आली असुन सदर सुनावणी दि.१५/०९/२०१८ रोजी दुपारी १२.०५ वाजता आयोजित करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने अपिलार्थी अर्जदार व जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (आस्थापना)/सहा.जनमाहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, प्रभाग क्र.४ यांना जा.क्र.मिभामनपा/ उपआ.आस्था/३६५/२०१८ दि.१०/०९/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) <u>अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद</u>:- माहिती अधिकार अंतर्गत मला अपुर्ण माहिती देऊन मानसिक त्रास दिला असुन माहिती अधिकार कायद्याचा पुर्णपणे Violation केले आहे.

२) **<u>जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-</u>** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

## -: निर्णय :-

१) मुद्दा क्र.१ व २ ची माहिती मिळाल्याचे अपिलार्थी अर्जदाराने सुनावणी दरम्यान मान्य केले असुन मुद्दा क्र.३ व ४ बाबत जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक यांनी विधी विभागाचे मार्गदर्शन घेऊन अपिलार्थी अर्जदारास १० दिवसांत नि:शुल्क माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक यांनी यापुढील प्राप्त झालेल्या माहिती अधिकार अंतर्गत अर्जावर विहित मुदतीत कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-
१) श्री.कृष्णा सी. गुप्ता,
एस-१०६, पाटाडिया कॉम्प्लेक्स,
जनार्दन रकवी मार्ग, उत्तन रोड,
भाईंदर (प.), जि.ठाणे. ४०११०१.

२) जन माहिती अधिकारी तथा
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना) यांचे कार्यालय.